
तळणावळणांचे रस्ते आणि या नागमोडी रस्त्यांना लाल मातीची ऊब. रस्ता संपला तिथे समोर दिसत होत्या माडपोफळींच्या बागा आणि उन्हात चमचमणारा समुद्र. ही फीचर्स नसतील, तर ते तळकोकणातलं गाव शोभणारच नाही. मसुरे गावाजवळ कालावल खाडीच्या परिसरात आम्ही आलो, तेव्हा हे दृश्य नजरेत भरलं होतं. खाडीच्या अलीकडचा भरतगड नुकताच पाहून झाला होता. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग या सर्वपरिचित नावांपुढे कोकणातला भरतगड तसा अपरिचितच. त्यामुळेच भरतगडावरची शिल्लक तटबंदी आणि बुरुज पाहून थोडं चकितच व्हायला झालं होतं. कालावलची खाडी पार केल्यावर दिसलेल्या भगवंतगडाने मात्र हे सुख दिलं नाही. दोनच दिवसांनी राजापूरजवळच्या यशवंतगड आणि आंबोळगड यांच्या दर्शनातही असाच काहीसा अनुभव होता. राजापूरच्या मुसाकाजी बंदराकडे लक्ष ठेवण्यासाठी बांधलेल्या यशवंतगडाचं प्रवेशद्वार तसं मोडकळीसच आलेलं...पण थेट खाडीपर्यंत गेलेली तटबंदी मात्र आजही शाबूत आहे. त्याचवेळी जवळच्याच आंबोळगडावर मात्र अस्ताव्यस्त पसरलेल्या वडाच्या झाडाच्या पारंब्यांखेरीज काही उरलेलं



नाही. जलदुर्गांच्या या मोहिमेत अशी अनेक आश्चर्य आणि कधी न पाहिलेला कोकण पाहण्याचं भाग्य मिळत होतं.

आता कोकण पर्यटनाच्या नकाशावर महत्त्वाचं स्थान मिळवतंय. तारकर्ली, वेंगुर्ला, मालवण इथल्या बीचवर अलिबाग, किहीम या रायगड जिल्ह्यातल्या किनाऱ्यांप्रमाणेच पर्यटकांची झुंबड असते. कोकणचे रमणीय किनारे, तिथली लाल माती, माडपोफळीच्या बागा, आमराई हे सारं नितांत सुंदर आहेच. पण त्याचबरोबर कोकणच्या मातीला संरक्षण देणारे जलदुर्ग हेही कोकणचं एक आगळं वैशिष्ट्य आहे. जलदुर्गांच्या रुपाने उभा असलेला वेगळ्या वाटेवरचा कोकण पाहण्याचं उद्दिष्ट चक्रम हायकर्स आयोजित सागरी सह्यांकनामध्ये पूर्ण झालं. संस्थेने रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त प्रथमच डोंगरी किल्ल्यांऐवजी संपूर्णपणे जलदुर्गांच्या सफरीचा मार्ग या तेराव्या सह्यांकनामध्ये निवडला होता. त्यामुळेच यंदा पाठीवर भलीमोठी सॅक ठेवून उन्हातान्हातून मैलोन्‌मैल पायी रपेट करण्याऐवजी प्रवाशांच्या सेवेसाठी हे बिरुद मिळवणारी समस्त ट्रेकर्सची लाडकी 'यष्टी' डोंगरयात्रींच्या दिमतीला होती. प्रवास एसटीने होता, तरी पाच दिवसांत मालवण ते

छाया : समीर कर्वे



# जलदुर्गांचं स्मरणीय सह्यांकन

**मालवणच्या सिंधुदुर्गापासून रत्नागिरीतील जयगडपर्यंत कोकणपट्टीतील १३ गड-किल्ले आणि प्राचीन मंदिरं यांची सफर या मोहिमेत घडली. चक्रम हायकर्स या संस्थेचं १३ वं सह्यांकन यंदा डोंगरी मार्गाऐवजी सागरी मार्गावर जलदुर्गांच्या मोहिमेने अलीकडेच पार पडलं. कोकणच्या या अनोख्या रुपाची गाथा.**

रत्नागिरीपर्यंतची १३ जलदुर्गांची भ्रमंती आणि सभोवतीच्या प्राचीन मंदिरांची सफर करायची असल्याने प्रत्येक ठिकाणच्या वेळा काटेकोरपणे पाळणं अगत्याचं होतं. प्रत्येकी ४५ जणांच्या गट यानुसार पाच गटांमधून २०० हून अधिक दुर्गप्रेमींनी ही सफर केली.

गेली तीन शतकं ऊन-वारा, पाऊस आणि कित्येक लाटांचा मारा झेलत उभे असलेले जलदुर्ग इथे पहायला मिळत होते. कित्येक जलदुर्गांच्या तटबंदी आजही मजबूतपणे उभ्या आहेत. पण या तटबंदीला वड तसंच इतर अनेक झाडांच्या मुळांनी घेरलंय. काही ठिकाणी तर दगडांच्या मधून आपोआप ओवली गेलेली मुळं पहायला मिळाली. लोकवस्ती तसंच वाहतूक, मच्छिमारी यामुळे काही गडांवर स्थानिकांचा राबता



सारखा असला, तरी दुर्गसंवर्धनाचं किंवा दुर्गसफरीचं महत्त्व इथे फारसं नाही. त्यामुळेच ही कोकणवारी वेगळं काही देणारी होती. एरव्ही असा बुरुज-तटबंदी शिल्लक न उरलेला आंबोळगड पहायला कुणी जाणार नाही. पण गडाचं त्यावेळचं सामरिक महत्व पहायचं, तर इथे जायलाच हवं. अशी अनेक ठिकाणं या कोकणयात्रेत पहायला मिळाली.

जलदुर्गसफरीची सुरुवात मालवणपासून झाली. रात्रभराचा प्रवास करून मालवणमध्ये नाथ पै सेवांगणामध्ये उतरल्यानंतर कोकणचा फील घेऊनच सर्वांना ताजंतवानं वाटू लागलं. सकाळच्या पारी प्रसिध्द सिंधुदुर्गापर्यंत धडक मारली. १६६४ साली मालवणभेटीत कुरटे बेट शिवरायांच्या चाणाक्ष नजरेत भरलं आणि १६६७ साली शिशाच्या वापराने हा किल्ला इथे पूर्ण झाला होता. सिंधुदुर्गासमोरच असलेला पद्मकोट आणि नैसर्गिक पाषाणांच्या तटबंदीचा राजकोट यांचं दर्शन झाल्यावर चिवला बीचवर सूर्यास्त आणि चांदीच्या थाळीसारख्या चंद्राचा उदय पाहण्याची मजा काही औरच होती. मच्छिमारी नौकांवरचे दिवेही लुकलुकू लागले होते.



दुसरा दिवस सर्जेकोटाच्या वारीने सुरू झाला. त्यानंतर १६८० पासून अस्तित्वात असलेला भरतगड पाहून कालवलची खाडी नौकेने पार केली. केरळच्या बॅकवॉटरला लाजवेल अशी ही सफर होती. खाडीपलीकडचा भगवंतगड पाहून आचरे येथील रामेश्वर मंदिराचं दर्शन घेतलं. मंदिरासमोरच शिवरायांनी वडाच्या झाडाभोवती बांधलेला पार आहे. इथून कुणकेश्वर मंदिराकडे कूच केली. अकराव्या शतकात यादवांनी निर्मिती केलेल्या या मंदिराचा शिवरायांनी नीळकंठ बावडेकर यांच्यामार्फत देवस्थानचा जीर्णोध्दार केला होता. मंदिरापूर्वीच काही अंतर अगोदर उतरून पांढऱ्या वाळूच्या प्रशस्त पुळणीवरून सूर्यास्ताचे लालबुंद किरण अंगावर घेत कुणकेश्वराच्या विशाल मंदिरापर्यंतची वाटचाल स्मरणीय ठरली.

तिसऱ्या दिवशी खंदकाचं वैशिष्ट्य असलेला देवगड, विमलेश्वराचं निसर्गसुंदर मंदिर पाहून शिवरायांच्या आरमारी दूरदृष्टीचा नमुना ठरलेल्या विजयदुर्गाची सफर झाली. इंग्रजांची जहाजं बुडाशी आपटून त्यांचा खात्मा व्हावा, यासाठी बांधलेली पाण्याखालची तटबंदी हे तर विजयदुर्गाचं अवाक् करायला लावणारं आश्चर्य. शिलाहार राजा भोज याने तेराव्या शतकाच्या प्रारंभी निर्मिती केलेला हा किल्ला आजही कणखरपणे उभा आहे. विजयदुर्गानंतर आमची स्वारी राजापूरकडे निघाली. राजापूरचं गंगातीर्थ आणि नैसर्गिक मेडिसीन असलेल्या गरम पाण्याच्या कुंडात ताजंतवानं झाल्यावर जवळपास नदीतूनच आमची बस राजापुर मुक्कामी पोहोचली.

पुढच्या दिवशी धूतपापेश्वराचं रमणीय मंदिर, नंतर यशवंतगड, आंबोळगड अशी ठिकाणं करीत कनकादित्याच्या मंदिरापर्यंत आलो. सूर्यनारायणाचं दर्शन आणि ८०० वर्षांपूर्वीचा ताम्रपट ही इथली वैशिष्ट्यं होती. त्यानंतरची संध्याकाळ मुचकुंदी नदीच्या





मुखावरील पूर्णगडावर साजरी झाली. हळूहळू तळकोकणातून वर येऊन रत्नागिरीचा फील येऊ लागला होता. शेवटचा मुक्काम गणेशगुळ्याच्या गर्द झाडीतील गावात होता.

शेवटच्या दिवशी रत्नागिरीच्या रत्नदुर्गावरून भगवती बंदराचं मनोरम दर्शन झालं. तिथून गणपतीपुळेमार्गे जयगड बंदरात पोहोचलो. तटबंदीसह किल्लेदाराचं मंदिर, धान्य कोठारं, तीन विहिरी आदी अवशेष शास्त्री नदीच्या मुखावर विजापूरकरांनी उभारलेल्या जयगड किल्ल्यावर दिसतात.

जयगडानंतरचं कऱ्हाटेश्वर हे नितांतसुंदर ठिकाण आजही डोळ्यापुढून हलत नाही. समोर खाऱ्या पाण्याने भरलेला अथांग सागर असतानाही इथल्या गोमुखातून थंडगार गोडं पाणी अहोरात्र वाहत असतं. मालवण ते रत्नागिरीपर्यंतची ही सफर या गोड पाण्याच्या चवीसारखी अवीट ठरली. पदोपदी कोकणातल्या साध्याभोळ्या शहाळ्याच्या काळजाच्या माणसांचं सहकार्य लाभलं. सदानंद आपटे यांनी हा पूर्ण रुट आखण्यामध्ये घेतलेले परिश्रम कारणी लागले.

>> समीर कर्वे
sameer.karve@timesgroup.com